नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचा लेखापरिक्षण अहवाल संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.४६/कोषा प्रशा-४,

दालन क्र.३३७,विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,मुंबई-४०००३२

दिनांक-०६ ऑगस्ट, २०१९.

शासन परिपत्रक:-

तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार शासन निर्णय, वित्त विभाग क्र.स्थानिले-१०१०/प्र.क्र.-२६ ब/विमा प्रशा/मंत्रालय, मुंबई ३२, दि.३१ मार्च,२०११ व महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० नुसार स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागामार्फत राज्यातील सर्व महानगरपालिकांचे सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासूनचे लेखापरीक्षण करणेत येत आहे.

स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम ८ नुसार लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर लेखापरीक्षणाचा अहवाल महानगरपालिकेस पाठविण्यात येत असतो. सदर अधिनियमातील कलम १०(४) अन्वये अहवाल प्राप्त झाल्यानंतर आयुक्त यांनी एक महिन्याच्या आत सर्व जनतेस पाहण्यास खुला केला असला पाहीजे तसेच वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणेबाबतची तरतूद स्वयंस्पष्टपणे नमूद आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील १०७(अ) नुसार लेखापरीक्षण अहवाल महानगरपालिकेस प्राप्त झालेवर महानगरपालिका आयुक्त यांनी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेची तरतूद आहे.

मात्र महानगरपालिकेकडून अहवाल प्रसिद्धीबाबत कार्यवाही होत नसल्यामुळे लेखापरीक्षण अहवालाच्या मागणीसाठी जनतेकडून व माहिती अधिकारात स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग व वित्त विभागास वारंवार पत्रव्यवहार होत असतो.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० कलम १०(४) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील १०७(अ) चे अनुषंगाने खालील प्रमाणे सूचना प्रसारित करण्यात येत आहे.

१) महानगरपालिका, महानगरपालिका परिवहन उपक्रम, महानगरपालिका शिक्षण मंडळ तसेच नगरपालिका व नगर परिषदा आणि त्यांचे महानगरपालिका शिक्षण मंडळ यांचे सन २०११-१२ पासून चे प्राप्त सर्व लेखापरीक्षण अहवाल १५ दिवसांत त्यांचे अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावेत.

२) यापुढे लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झालेवर एक महिन्याच्या कालावधीत अधिकृत संकेतस्थळावर जनतेसाठी उपलब्ध करून देण्यात यावेत.

३) स्थानिक निधी लेखापरीक्षण संचालनालयाने याबाबत पाठपुरावा करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०८०६१४३८२१०६०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=6015944fe7d58a83f4a54c43147b5da1e34861e2984e9f793b66f7249aaa9c1a, postalCode=400032, street=Y-5/66,GOVERNMENT COLONY,MUMBAI, serialNumber=d4994742192306fcc1dea9aadd3810639506519fa652b919767b98b04e905a18, ou=FINANCE DEPUTY SECRETARY, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2019.08.06 14:51:02 +05'30'

(इंद्रजित गोरे)
शासनाचे उपसचिव

प्रति-

संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा,संचालनालय,कोकण भवन,नवी मुंबई.

प्रत :-

१.मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा/विधान परिषद व संसद सदस्य.
३. राज्यपालाचे सचिव.
४. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. विभागीय आयुक्त सर्व.
७.प्रधान सचिव ,नगर विकास विभाग,मंत्रालय .
८. मूळ प्रबंधक,मुळ न्यायालयीन शाखा,उच्च न्यायालय,मुंबई.
९. प्रधान महालेखापाल(लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१०.प्रधान महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-१,महाराष्ट्र,मुंबई.
११. महालेखापाल(लेखापरीक्षा) -२,महाराष्ट्र,नागपूर.
१२ महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२,महाराष्ट्र,नागपूर.
१३.प्रबंधक उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
१४.सचिव,महाराष्ट्र,विधिमंडळ सचिवालय ,मुंबई.
१५.लोक प्रबंधक,लोकायुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय मुंबई.
१६. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई.
१७.संचालक,नगर पालिका प्रशासन,सरपोचखानवाला मार्ग,वरळी,मुंबई.
१८. आयुक्त महानगरपालिका सर्व.
१९.सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे,कोकण,नागपूर,अमरावती,नाशिक, औरंगाबाद विभाग.
२०.सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा,मनपालेप.
२१. सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा सर्व जिल्हे.
२२. प्रशासकीय अधिकारी महानगरपालिका शिक्षण मंडळ सर्व.
२३.प्रशासकीय अधिकारी नगरपालिका /नगरपरिषद शिक्षण मंडळ सर्व.
२४. मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपरिषदा सर्व.
२५.परिवहन व्यवस्थापक महानगरपालिका परिवहन उपक्रम सर्व.
२६. परिवहन व्यवस्थापक नगरपालिका/नगरपरिषदा परिवहन उपक्रम सर्व.